पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा लोहमार्ग पुणे
सत्यमेव जयते

# प्रेस नोट

## रेल्वेमधुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या हातावर फटका मारुन मोबाईल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास शिवाजीनगर येथुन स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे यांनी जेरबंद करुन त्याच्याकडुन १,५५,००० रु किमतीचे १२ महागडे मोबाईल केले जप्त

.................................................................................

फिर्यादी नामे प्रेम तिमलु तुपधर ,वय.१८ वर्षे ,धंदा.शिक्षण ,रा.प्रायव्हेट रोड ,लुंबीनीनगर ,लेन नं.२ ,रुम नं.१७ ,पुणे स्टेशन ,जि.पुणे मो.नं.८८८८५५७१६४ हे दि. २२.०७.२०१८ रोजी १८.३० वा.सुमारास मुंबई भुवनेश्वर कोणार्क एक्सप्रेस गाडीच्या जनरल डब्याच्या दरवाज्यात उभे राहुन लोणावळा ते पुणे असा प्रवास करत असताना खडकी रेल्वे स्टेशन सुटल्यानंतर हळुहळु जात असताना दोन इसमांनी संगनमत करुन त्यांच्या डाव्या हातावर काठीचा फटका मारुन त्यांच्या हातामधील २१,९९० /– रु ,किमतीचा ,Vivo व्हि ७ ,प्लस कंमनीचा सिल्व्हर रंगाचाा मुददाम लबाडीने चोरुन नेला म्हणुन फिर्याद दिल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पुणे रेल्वे स्टेशन हददीमध्ये रेल्वेतील प्रवाशांच्या हातावर फटका मारुन मोबाईल चोऱ्या करण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याने स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे व आर.पी.एफ .पुणे यांनी संयुक्तपणे मोहीम राबवली असता खबऱ्यामार्फत खात्रीशिरपणे माहिती मिळाली की शिवाजीनगर येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार शाहरुख रशिद खरादी हा त्याच्या साथीदारासह अशाप्रकारचे गुन्हे करत आहे.मिळालेल्या खबरीप्रमाणे शिवाजीनगर बाजुकडील यार्डामध्ये सापळा लावला असता संध्याकाळच्या वेळी कोणार्क गाडीच्या वेळेस शाहरुख खरादी हा आरोपी गुन्हा करण्याच्या इरादयाने रेल्वे ट्रॅकच्या कडेला काठी घेवुन तयारीत असताना मिळुन आला.त्यास अटक करुन तपास केला असता त्याने अशाप्रकारचे गुन्हे शिवाजीनगर व खडकी रेल्वे स्टेशन येथे केले असल्याची कबुली दिली .या आरोपीकडुन तपासामध्ये १,५५,०००/–रु किमतीचे १२ महागडे मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.त्यामध्ये पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे गु.र.नं.८०६/०१८ ,भा.द.वि.३७९ ,३५६ ,३४ व पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं. गु.र.नं.६०७/०१८ ,भा.द.वि.३७९ ,३५६ ,३४ हे गुन्हे उघडकीस आले असुन इतर मोबाईलबाबत तपास चालु आहे.पुढील तपासामध्ये आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.यातील अटक आरोपी शाहरुख खरादी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे यापुर्वी देखील अशाप्रकारचे दोन गुन्हे दाखल आहेत.

मा.पोलीस अधीक्षक .लोहमार्ग पुणे श्री.दिपक साकोरे साहेब व अपर पोलीस अधिक्षक .श्री .तुषार पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे अनिल दबडे ,स.पो.निरी.मंगेश जगताप ,पोलीस कर्मचारी अमरदिप साळुंके,संतोष चांदणे ,श्रीकांत भोसले, अनिल दांगट,निलेश बिडकर,जनार्दन गर्जे,राजेश कोकाटे,ज्ञानेश्वर सुर्यवंशी व आर.पी.एफ उप.निरी.चंद्रशेखर रोकडे ,विनोद पानसरे ,मनीष यादव यांनी सदरची कारवाई केली आहे.